GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 8 | FEBRUARY – 2017

भारत - चीन सौहार्द व संघर्षाचे संबंध

प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख , संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय,नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे .

प्रस्तावना (Introduction) :

दक्षिण आशियातील दोन महासत्ता म्हणून भारत व चीन यांच्याकडे बघीतले जाते. आशियातील सत्ता संतुलनाच्या दृष्टीने या दोन्ही महासत्तांचा उल्लेख उगवत्या आर्थिक महासत्ता म्हणून वर्णन केलेले दिसून येते. भारत आणि चीन हे देश एकमेकांच्या शेजारी राष्ट्रे असल्यामुळे दोघोंच्या संबंधाचा परिणाम दोन्ही देशांच्या प्रगतीवर होतोच पण त्याबरोबरच आशिया खंडातील राजकारण व सत्तासंतुलन यावर होतो. या सर्व गोष्टींचा विचार केला तर असे दिसते की, भारत व चीन यांच्यातील संबंध हे वर्तमान जागतील समीकरणावर प्रभाव टाकत आहे.

१९५० मध्ये ज्यावेळी चीनने तिबेटवर कब्जा मिळविला त्यावेळेस भारताने या घटनेचा निषेध केला. भारताच्या दृष्टीकोनातून हा अतिशय संवेदशील असा मुद्या होता. कारण तिबेटमधील चीन चे लष्कर व लोक अस्तित्व भारत देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून थेट धोका उत्पन्न करणारे असल्याने ही अतिशय चिंतेची बाब होती. भारताने स्वातंत्र्य प्राप्तीच्या नंतरच्या काळात एक स्वतंत्र अशा प्रकारचे धोरण ठरवून जगासमोर एक वेगळा पायंडा पाडलेला आहे. तो म्हणजे रशिया व अमेरिका यांच्या कोणाच्याही गोटात

सामील न होता तटस्थतेचे धोरण स्विकारुन भारतीय परराष्ट्रधोरणात अलीप्तता वादाचा (Non - alignment) चा स्विकार केला. त्यामुळे भारत चीन संबंधाला नवीन वळण मिळाले. त्यामुळे सहकार्यात्मक संबंधाला व विकासाला चालना मिळाली तसेच संघर्षही घडून आला.

संशोधनाची उद्दिष्टचे (Objectives)

१) भारत व चीन मधील सौहार्दपूर्ण संबंधाचा अभ्यास करणे.
२) भारत व चीन मधील संघर्षात्मक बाबींचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती (Methodology)-

सदर लघुशोधनिबंधासाठी द्वितीय स्त्रोतांच्या तथ्य सामूग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीच्या नंतरच्य काळातील सौहार्दपूर्ण व संघर्षाच्या बाबींचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भातील लेख व माहिती आणि इंटरनेटवरुन संकलित माहितीच्या आधारे शोध निबंध तयार केलेला आहे.

भारत चीन - सौहर्दपूर्ण संबंधाचे विश्लेषण (Analysis of India & China Friendly relationship) :-

चीनच्या कम्युनिष्ट प्रजासत्ताकाची १९४९ मध्ये स्थापना झाल्यपासून भारत - चीन संबंध सौहार्दाचे होते. चाऊ - एन- लाय व जवाहरलाल नेहरु यांनी परस्परांच्या देशांना भेटी देऊन पंचशील तत्वाच्या आधारित मैत्रिचा करार झाला. १९४९ मध्ये हिंदी चीनी भाई भाई चा नारा लोकप्रिय झाला. पंचशिलाची कल्पना प्रथम चाऊ - एन- लाय यांनी विकसीत करुन मांडली. पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी पंचशीलाचा स्वीकार करुन आशिया खंडात नवे पर्व सुरु झाले.

पंचशीलाद्वारे देशाचे राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि एकता व अखंडत्व यांचा सन्मान, देशाच्या अंतर्गत व्यवहारामध्ये दुसऱ्या कोणत्याही देशाने हस्तक्षेप न करणे, एका देशाने दुसऱ्या सार्वभौम देशावर आक्रमण न करणे, सर्व राष्ट्रांना समानतेची वागणूक देणे आणि शांतीपूर्ण सहकार्याने मार्गक्रमण करणे ही पाच तत्व आहेत. नेहरु आणि चाऊ - एन- लाय यांच्या प्रभावी व्यक्तीमत्वामुळे आशियातील बहुतेक राष्ट्रांनी पंचशीलाचा स्वीकार केलाच पण त्याच बरोबर ती तत्वे अनेक राष्ट्रांना उपयुक्त वाटू लागली. पंचशील म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी एक आदर्श आचारसंहिता आहे असे म्हटले जाऊ लागले.

भारत - चीन संबंधाला भारताने नव्या सरकारला मान्यता दिल्यापासून सुरुवात झाली. क्रांतीनंतर चीनच्या नव्या शासनाला मान्यता देण्यात भारत पहिल्या

दहा राष्ट्रात व आशिया खंडात दुसरा देश होता. त्यानंतर चीनने तिबेटवर आक्रमण केले. दलाई लामांनी भारताकडे मदत मागून भारताकडे आश्रय घेतला त्यामुळे भारत - चीन संबंध ताणायला सुरुवात झाली.

सन २००० पासून भारत - चीन ही राष्ट्रे अवकाश संशोधन क्षेत्रात महाशक्तीच्या रुपात विकसित होत आहेत. परंतु दोन्ही राष्ट्रांची या क्षेत्रातील शक्ती स्थळे भिन्न भिन्न आहेत. चीन प्रक्षेपण यान तंत्रज्ञान तर भारत प्रक्षेपणाच्या सॉफ्टवेअर प्रोग्रम तंत्रज्ञानात विकसित आहे. जर भारत व चीन अवकाश संशोधन क्षेत्रात एकत्रीतपणे सहकार्य केले तर पाश्चीमात्य देशांवर अवलंबून राहणे भारत- चीनचे कमी होवू शकते. भारत, चीन ही राष्ट्रे इ.स.२००३ च्या मा. पंतप्रधान वाजपेयी यांच्या चीन यात्रेपासून ते मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी चीन भेट मे २०१५ पर्यंत अवकाश संशोधन क्षेत्रात सहकार्य याबाबत विविध करार करण्यात आले. हे करार अवकाश क्षेत्रात शांततामय मार्गातले संशोधन, दूरसंवेदन, उपग्रहाचा विकास, वैज्ञानिक प्रयोगशीलतेला चालना आणि उपग्रह विज्ञानातील सहकार्यावर भर इत्यादी क्षेत्रातील होते.

ऊर्जा, खनिज खनन, संरक्षण, कृषी व जैव तंत्रज्ञान औषधी इ. क्षेत्रात सुद्धा भारत - चीन संबंधात सहकार्य, भागीदारी व सलोखा दिसून येतो.

जागतीक व्यापार संघटना (WTO), जागतिक बँक (WB), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), अन्न व कृषी संघटना (FAO), आंतरराष्ट्रीय वित्त निगम (IFC) इ. आंतरराष्ट्रीय संघटनेत आशिया अफ्रिका खंडातील अविकसित व विकसनशील राष्ट्रांचे प्रश्न निर्मूलन करतांना भारत चीन एकत्रीतपणे कार्य निदर्शनास येतात, अर्थात, आंतरराष्ट्रीय परिक्षेत्रात भारत - चीन संबंधात सहकार्य दिसून येते.

भारत चीन यांना जोडणारा धार्मीक व सांस्कृतीक दूवा म्हणजे बौद्ध धर्म हाये. त्यासाठी मा. नरेंद्र मोदींनी मे २०१५ च्या चीन भेटीत संग्रहालये, पुरातत्व विभाग यांच्यासह प्रमुख सांस्कृतिक संस्थांमध्ये सहकार्य करार करण्यात आले.

भारत - चीन संघर्षात्मक संबंधाचे विश्लेषण (Analysis of India China Conflict Relationship)

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. १९४९ मध्ये माओच्या नेतृत्वाखली क्रांती होऊन कम्युनिष्ट पार्टीच्या सरकारने ताब्यात घेतले. १९५० मध्ये चीनने तिबेटवर कब्जा मिळविला याचा भारताने निषेध केला व चीनने आपल्या राजवटीअंतर्गत स्वायत्तता द्यावी अशी मागणी केली. मात्र चीनने मागणी फेटाळून लावली. या घटनेपासून भारत व चीन यांच्या संबंधामध्ये तिबेट हा कळीचा मुद्या राहीला आहे. चीनने तिबेटवर कब्जा केल्यानंतर भारताने त्याचा निषेध केला. त्यामुळे भारत चीन संबंधात दुरावा निर्माण झाला. भारताने सध्या तिबेट हा चीनचा भाग असल्याचे मान्य केले असले तरी तिबेटच्या स्वायत्ततेच्या मागणीविषयी भारताने नेहमी सहानुभूती व्यक्त केलेली आहे. दलामी लाभांच्या आश्रय देण्याच्या भारताच्या कृतीला शत्रूत्वाची कृती ठरविले आणि चीनने भारताशी व्यापारी व पर्यटनावर बंदी घातली. चीनने भारत चीन मधील मॅकमोहन रेषा मान्य करण्यास नकार दिला.

सीमावाद (Conflict of Border)

भारत - चीन संबंधामध्ये आजही सीमावाद हा अतिशय महत्वाचा घटक आहे. भारताची चीनबरोबर लंडाखपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत सीमा असुन प्रत्यक्ष काही भागावर चीनने आपला हक्क सांगीतला आहे. अरुणाचल प्रदेश पूर्ण आमचाच आहे असे चीन म्हणतो. हा प्रदेश अतिशय दुर्गम व उंच आहे. याठिकाणी दळणवळण यंत्रणेचा आभाव आहे. भारताने या बाबीकडे फारसे लक्ष दिले नाही याउलट चीनने तिबेट व त्याला जोडलेल्या भागात रस्त्यांचे व रेल्वेचे जाळे उभे केले आहे. शिवाय सीमेजवळ हवाई धावपट्ट्या वापरात आणायला सुरुवात केली आहे. १९६२ च्या भारत चीन युद्धामध्ये ३८००० चौ. कि.मी. सीमा भागावर चीनच्या कब्जा आहे. तसेच चीनने जम्मू काश्मीरच्या संदर्भात तो एक स्वतंत्र व सर्वाभौम भाग आहे. तो भारतापासून अलीप्त आहे. असे जागतीक मत करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच भारत चीन मधील सीमावाद दोन्ही देशांच्या विकासाच्या व्यापारावर परिणाम करत आहे.

चीनचा वाढता प्रभाव (Impact of China)

गेल्या काही वर्षात चीनी लष्कराने प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडून भारताच्या हद्दीत अनेकवेळा घुसखोरी केली आहे. सरहद्दीच्या सर्वच भागात अतिक्रमण होत असून त्यातील आक्रमकता अगदी स्पष्ट आहे. त्याशिवाय सरहद्दीच्या प्रश्नावर ज्या वाटाघाटी झाल्या त्यात चीनने अधिकृतरित्या तवांग प्रदेशावर आपला दावा केला होता. ऑक्टोबर २००५ मध्ये पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी तवांगला भेट दिल्यानंतर चीनने तीव्र शब्दात निषेध नोंदविला पद्धतशीररित्या भारतावर सतत दबाव वाढविण्याचा चीनचा प्रयत्न याद्वारे दिसून येतो. परिणाम उभय देशातील संबंधात संघर्ष निर्माण होतो.

एन सर्कलमेंट कॅम्पेन (N Cirucalment Campaign)

सन त्झू हा चीनचा लष्करी अधिकारी होता. त्याने शत्रूविरुद्ध एन सर्कलमेंट कॅम्पेन हा प्रभावशाली मार्ग स्विकारण्याचे धोरण सूचविले होते. शत्रूला चहूबाजूने घेऊन त्याला त्रस्त करायचे आणि तो नामोहरण झाला की मग त्यावर हल्ला करायचा असे धोरण होते. याचा धोरणाचा वापर सध्या चीन करत आहे. चीनच्या सरकारी मूखपृष्ठावर भारताविरोधी मजकूर प्रसिद्ध करणे भारताच्या सीमेलगत सैनिकी हाचचाली वाढविणे ह्या सर्व गोष्टी एन सर्कलमेन्ट कॅम्पेनचा भाग म्हणून सूरु आहेत. याचाबरोबर चीनने पाकव्याप्त काश्मीरमध्ये, तिबेटमध्ये सैन्य आहे. त्याचबरोबर भारतीय उपसागरात बंदरावर प्रवेश करुन भारतवार वेढा दिला आहे. सध्या चीन भारतावर हल्ला करणार नसला तरी भारताला नामोहरण करण्यासाठी आर्थिक व मानसीक स्वरुपाचे हल्ले निश्चीत सुरु झाले आहेत.

चीनचे शस्त्र धोरण :

चीनच्या शस्त्रधोरणामूळे उभय देशातील संबंध ताणले गेल्याचे चित्र दिसून येते. चीनच्या वाढत्या लष्करी शक्तीविषयी पेंटॅगॉनने जो अहवाल अमेरिकेत प्रसिद्ध केला त्यात अमेरिकी हितसंबंधाला चीनकडून संभाव्य धोक्याची माहिती आहे. यावरुन भारतातही सावध भूमिका घ्यावी लागली. चीनने भारताच्या सरहद्दीवर सीसीएस ५ ही मध्यमपल्ल्याची अण्वस्त्रवाहू क्षेपणास्त्र यंत्रणा तैनात केलेली आहेत. याशिवाय सायबर युद्धाची क्षमता, विमानवाहू नौका, उपग्रह भेदी, क्षेपणास्त्रे आणि जे-२० ह्या अद्ययावत लढावू नौका ह्या चीनकडील शस्त्रासामूग्रीचा परिणाम दोन्ही देशांच्या संबंधावर परिणाम करतो.

चीनचे विस्तारवादी धोरण :

चीनने भारत पाकिस्तान संघर्षामध्ये नेहमी पाकिस्तानची बाजू घेतली आहे. चीनने पाकिस्तानला आण्वीक तंत्रज्ञान विकसीत करण्यात व शस्त्रास्त्रांच्या पूरवठ्यात मदत केली आहे. भारताच्या उत्तरपूर्व भागातील नागा, मिझो ह्या बंडखोरांना शस्त्र पुरविण्याची भूमिकाही चीनने घेतली आहे. पाकिस्तानचा भिडलेला भाग आणि पूर्व दिशेला भूतानपासून ब्रम्हदेशापर्यंत पसरलेला विस्तार्ण पट्टा या प्रदेशावर चीन आपला अधिकार सांगत आहे. सातत्याने सिमावर्ती भागामध्ये घुसखोरी करण्याचे धोरण चीनची विस्तारवादी वृत्ती स्पष्ट करते.

भारताचे अण्वस्त्र धोरण (India's Nuclear Policy)

चीन पाकिस्तानचे भारताविरोधी मैत्रीचे संबंध, अमेरिकेची पाकिस्तानला मदत, शस्त्रास्त्रे पुरवठा करण्याचे धोरण इ. कारणांमुळे भारताची सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यासाठी स्वसंरक्षणासाठी आपली ऊर्जेची गरज भागविण्यासाठी भारताने इंदिरा गांधीच्या शासन काळात १८ मे १९७४ मध्ये राजस्थानमधील पोखरण येथे भूमिगत पद्धतीने अणूचाचणी केली. या अणूचाचणी विरोधी चीनने अपप्रचार करण्यास सुरवात केली. भारत आपल्या शेजारील राष्ट्रांना भयभीत करण्यासाठी, त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी मुद्दाम आशियाखंडात शस्त्रास्त्र स्पर्धा करीत आहे. चीनने असाच अपप्रचार ११ मे व १३ मे १९९८ च्या अणू चाचणीच्या वेळेससुद्धा केला होता. इ.स. १९९८ च्या अणूचाचणीनंतर चीन भारत संबंधात काही काळ तणाव निर्माण झाला होता. परंतु भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग यांनी चीनला भेट देवून अण्वस्त्रधोरणाबाबत भारताची भूमिका चीनला स्पष्ट करुन दिली. भारत अमेरिका अणू करार २००५ याबाबत चीन अशाच प्रकारे साशंक दिसून येतो. भारताच्या अण्विक धोरणामूळे भारत चीन संबंधात अविश्वासाच्या वातावरणांची निर्मिती होत आहे. अशा ह्या चीनी ड्रॅगनपसून आपण सावध राहिलो पाहिजे.

भारत चीन सबंध सुधारणासाठी उपाययोजना (Remedies of Improvement of India China Relationship)

१) पंचशील तत्व प्रत्यक्षात आणण्यासाठी दोन्ही राष्ट्रांनी कटिबद्ध रहावे.
२) वेगवेगळे व्यापारी फोरम स्थापन करुन त्या देशातील उद्योजकांचे व्यापारी संबंध वाढवावे.
३) पंतप्रधान, राष्ट्रध्यक्ष, परराष्ट्रमंत्री यांनी नियमितपणे एकमेकांच्या देशांना भेटी द्याव्यात.
४) भारत आणि चीन यांचे मित्रत्वाचे व्यापारी संबंध वृद्धींगत करणाऱ्या परिषदांचे आयोजन करण्यात यावे.
५) प्रसारमध्यमे, आशासकिय, स्वयंसेवी व सामाजिक संघटनांनी या संदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन विधायक मत तयार करावे.

निष्कर्ष (Conclusion)

भारत व चीन ह्या आशियाखंडातील दोन मोठ्या शक्ती आहेत उद्याच्या महासत्तांमध्ये ह्या दोन्ही देशांची गणना होऊ लागली आहे. परिणामी दोन्ही देशात स्पर्धा सुरु आहे. एका बाजूला पंचशील कराराने भारताबद्दल आस्था दाखवायची व दुसऱ्या बाजूला सीमावाद उकरुन काढायचा ही दुटप्पी प्रवृत्ती दोन्ही देशांसाठी घातक आहे. म्हणून जागतिक प्रश्नावर भारताने कोणाच्याही दबावाला बळी न पडता स्वंतत्रपणे आपली भूमिका घेणे गरजेचे आहे. भारत आणि चीनने शह प्रतिशहाचे राजकारण थांबवावे.

भारत चीन या दोन्ही राष्ट्राचे ऐतिहासिक काळापासूनचे संबंध आहेत. कधी मित्रत्वाचे तर कधी शत्रूत्वाचे संबंध निर्माण झाले संबंध सुधारत असतांना चीनकडून भारताची खोड काढली जात आहे व चहूबाजूंनी भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न चीनकडून होत असून भारताच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. तेव्हा भारताने सावधतेने निर्णय घेणे आवश्यक आहे.

संदर्भ (References):

१) देवळाणकर शैलेंद्र,"भारतीय परराष्ट्रधोरण" सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन पुणे २००७.
२) तोडकर बी.डी. "भारत आणि जग", डायमंड पब्लीकेशन पुणे २०१०.
३) पवनकुमार, "भारत की विदेशनिती", आयोग प्रकाशन, नई दिल्ली २०१०.
४) दिक्षित जे. एन., "भारत विदेश निती", प्रभात प्रकाशन, दिल्ली २००४.
५) टिकेकर मनिषा, "भारत आणि भारताचे शेजारी", साधना प्रकाशन, पुणे २००९.

६) धर्माधिकारी अविनाश, मासिक चाणाक्य मंडळ परिवार, स्पर्धा परिक्षा पुणे, फेब्रुवारी २०१५.
७) भारत चीन संबंध सकारात्मक, दैनिक पुण्यनगरी, ३, फेब्रुवरी २०१५.
८) के.एल. बंगल, "मासिक प्रतियोगिता साहित्य, साहित्य भवन", आग्रा, नोव्हेंबर २०१४.
९) इंटरनेट.

प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख , संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय,नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे .